# Extension Activities

- **Students Teacher Participation in Social Camp**
- **Covid-19 Awareness to rural people and Distribution of Sanitizers and Masks.**
- **Awareness about Apiculture and important of Honey, Bees and their product.**
- **Participations in 99 days Online Project of IGEN (Institutes of Green Engineers) for Awareness and Social responsibility in Society about environment**
- **Lumpy Disease Awareness Program**
- **Health checkup (Temp. & Oxygen) during Covid 19 pandemic period by Zoology**
- **Nest and Water pot hanging activity on the occasion World Sparrow Day**

# Extension Activities




**Students and Teacher of the department Participation in tree plantation Camp**



**Mask and Sanitizer distribution to local people during Covid 19 pandemic period**





**Awareness about Apiculture and important of Honey, Bees and their product**




**Participations in 99 days Online Project of IGEN (Institutes of Green Engineers) for Awareness and Social responsibility in Society about environment**



The Institution of Green Engineers

IGEN SDG 7.9.13 BADGE V1.0

Project Completion Certificate

Presented to

**Dr. Chitra Dinkar Morey**

Shri. Shivaji Arts, Commerce and Science College

| | | |
|---|---|---|
| Project Unique ID | : | SDGBADGEPROJ: 013 |
| Project Title | : | The Value Of Green Vegetation and Green Cleanliness |
| Duration | : | 99 Days |
| Promotion Action | : | Poster, Video & Implementation |
| Outcome | : | 100 Trees planted with the team & 150 kg $CO_2$ reduced |
| Category | : | Star |

Proof URL link

Dr L. Ramesh
President IGEN

Er Hudson Egbert
General Secretary IGEN

Er Subramaniam.G
Head SDG Badge 7913

**Certificates of Participation**



# मोताळा येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सुयश

देशोन्नती वृत्तसंकलन...

**बुलडाणा** ■ स्व.डॉ.ए. पी.जे.अब्दूल कलाम यांच्या जयंतीनिमित्त दि इन्स्टिट्यूशन ऑफ ग्रीन इंजिनिअरींग एनव्हरमेंटल कन्व्हेसेशन ऑर्गनायझेशन ऑफ चेन्नई द्वारा ९९ दिवसांचा प्रकल्प आयोजीत करण्यात आला होता. या प्रकल्पामध्ये श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम राबवून हा प्रकल्प बेस्ट अचीव्हर ग्रुपने हा प्रकल्प यशस्वी केला. यशस्वी विद्यार्थ्यांना २५ ऑगस्ट रोजी प्राचार्य प्रा.डॉ.पांडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले.

आयजेन ग्रुप चेन्नई यांनी श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील प्रा.डॉ.चित्रा दिनकर मोरे यांची प्रोजेक्ट को ऑर्डिनेटर म्हणून निवड करण्यात आली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्याल-याच्या विद्यार्थ्यांनी ९९ दिवस सदर प्रकल्पावर काम केले. यासाठी प्रा.डॉ.चित्रा मोरे यांनी कॉलेजमधील बायोलॉजिकल असोसिएशनचे ६ स्टॉफ मेंबर्स तसेच बीएससी पार्ट-२ व बीएससी पार्ट-३ मधील १० विद्यार्थ्यांचा एक गट तयार केला होते. विद्यार्थ्यांनी ९९ दिवसा दरम्यान वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, आरोग्य काळजी, वेस्ट टू बेस्ट तसेच ओल्या व सुक्या कचऱ्यापासून खते तयार करुन शेतीपयोगी खते तयार केली. तसेच प्लास्टीकचे तोटे समाजावून सांगून प्लास्टीक निर्मुलनाचे कार्यक्रम राबविले. या कार्यक्रमाचे डेली अपडेट्स चेन्नईला पाठवून प्रकल्प यशस्वी केला. प्रा.मोरे तसेच विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष ऑनलाईन प्रेझेंटेशन घेऊन शिवाजी कॉलेजच्या या ग्रुपची बेस्ट अचीव्हर ग्रुप म्हणून प्रथम चारमध्ये निवड केली. हा महाराष्ट्रातील एकमेव ग्रुप ठरला आहे. यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.ठाकूर, प्रा.डॉ. अरुण गवारे, प्रा.डॉ.शुभम साखरे, प्रा.डॉ.राहुल उके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनिल मामलकर यांनी मोलाचे सहकार्य केले. **(प्रतिनिधी)**

**बेस्ट अचीव्हर ग्रुप महाराष्ट्रामध्ये पहिला..**
चेन्नई द्वारा आयोजीत ९९ दिवसाच्या ऑलनाईन प्रकल्पामध्ये श्री शिवाजी महाविद्यालय मोताळा येथील बेस्ट अचिव्हर ग्रुपने यश संपादन केले. या ग्रुपमध्ये शुभम जैस्वाल, मोहम्मद उमेर, सीमा खान, मिरा मिरगे, श्वेता चहाकर, मोहिनी शेळके, अंजली हांडे, श्रध्दा निकम, ज्ञानेश्वरी मालठाणे, कामिणी चोपडे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

ePaper देशोन्नती
Fri, 27 August 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/62727624




**Lumpy Disease Awareness Program**

# शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केली पशुपालकांमध्ये लम्पीबाबत जनजागृती

देशोन्नती वृत्तसंकलन...



**मोताळा** ■ स्थानिक श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथील प्राणीशास्त्र विभागातंर्गत बुधवार १९ ऑक्टोबर रोजी लम्पी आजाराबाबत तालुक्यातील खरबडी येथे पशुपालकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

जनावरांना होणाऱ्या 'लम्पी' संसर्गजन्य त्वचा आजारामुळे विदर्भातील पशुपालकांवर दुहेरी संकट कोसळले आहे. जनावरांमध्ये 'लम्पी' संसर्गजन्य आजाराची झपाट्याने वाढ झाली, बाधित जनावरांवर उपचार करून इतर जनावरांना लागण न होण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी लसीकरणावर भर दिला जात आहे. दुसरीकडे दुग्ध व्यवसायावर देखील 'लम्पी'चा दुष्परिणाम होत आहे.बाधित पशुधनाचा उपचार, अबाधितांचे लसीकरण, जनजागृती आदी उपाययोजना पशुसंवर्धन विभागाकडून राबविण्यात येत आहेत. शेतकऱ्यांच्या हितासाठी लंम्पी आजाराविषयी संपूर्ण माहिती जसे लंम्पी आजाराची लक्षणे, कारणे, प्रसारमाध्यमे, उपचार आणि उपाययोजना अशी माहिती पत्रकाद्वारे खरबडी येथील शेतकऱ्यांना तसेच गायी म्हशी पशुपालकांना देण्यात आली. प्राचार्य डॉ.गजानन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्राणीशास्त्र विभागांतर्गत हा जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ.अभय ठाकूर, डॉ अरुण गवारे, आणि डॉ.चित्रा मोरे आणि विद्यार्थ्यांनी ही जनजागृती केली. (**ता.प्र.**)

Buldhana Edition
Oct 21, 2022 Page No. 7



**Health checkup (Temp. & Oxygen) during Covid 19 pandemic period**











लोकमत

# चिमण्यांच्या संरक्षणासाठी सरसावले विद्यार्थी; कृत्रिम घरट्यांची केली व्यवस्था

## जागतिक चिमणी दिनानिमित्त मोताळ्यात उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**मोताळा** : शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी,कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २० मार्च रोजी जागतिक चिमणी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात बीएस्सीच्या विद्यार्थ्यांनी चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी व जलपात्र बनवून महाविद्यालय परिसरात लावले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाला आरएफओ नेहा मुरकुटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे आयोजन प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. अभय ठाकूर, प्रा.डॉ. चित्रा मोरे आणि प्रा. डॉ.अरुण गवारे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मोताळा येथे चिमण्यांसाठी कृत्रिम घरटे लावतात चित्रा मोरे व इतर.

घरातील रिकाम्या पाण्याच्या बाटल्या आणल्या, त्या आडव्या करुन एका बाजूने कापल्या यामुळे पाणी पसरट होईल, त्याचे झाकण घट्ट बसविले व तारेच्या साहाय्याने झाडावर टांगून त्यात पाणी ओतले. अशा प्रकारे एकही रुपया न खर्च करता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी टाकाऊपासून टिकाऊ संकल्पना राबवत पक्षांसाठी पाणपोई सुरु केली आहे.

**- प्रा.डॉ. अभय ठाकूर**

विद्यार्थ्यांचा एक स्तुत्य उपक्रम मनुष्यांसाठी पाणपोई सुरु केलेली सर्वत्र पाहतच होतो. मात्र आज महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पक्षांसाठी पाणपोई सुरु केली. ही खरंच चांगली कल्पना असून हा आदर्श व स्तुत्य उपक्रम असून पक्षाच्या जवळीकतेसाठी असे उपक्रम व्हावेत.सध्या पक्षी संवर्धनासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

**- डॉ. गजानन जाधव**
प्राचार्य

Hello Buldhana
Page No. 4 Mar 21, 2023
Powered by: erelego.com